नियमित दिवाणी दावा क्र. २१६ /२०१२
सुनिल परमणे
वि.
योगेश परमणे वगैरे

## **आदेश निशाणी क्र.५७ वर**

वादी यांनी स्वतः त्यांचे सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.३७ प्रमाणे दाखल केलेले आहे. त्यांची सरतपासणी पूर्ण झालेली आहे. परंतु उलट तपासणीसाठी ते हजर राहिले नाहीत. त्यामुळे त्यांनी दिलेले सरतपासणीचे प्रतिज्ञापत्र दुर्लक्षित करण्यात यावे असा आदेश करण्यात आला आहे. तो आदेश कॉस्ट रक्कम दिल्यानंतर मागे घेण्यात यावा असा आदेश करण्यात आला. परंतु वादी हे सदर कॉस्ट रक्कम भरु शकले नाहीत. ती कॉस्ट रक्कम देण्यास परवानगी मिळावी व वादी यांचा उलट तपास घेण्याचे निर्देश प्रतिवादी यांना द्यावेत यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

२. त्यावर प्रतिवादी क्र.१,३ व ४ यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. याच पक्षकारांचे दरम्यान नियमित दि.दावा क्र.१५/२०११ दाखल आहे. त्या तारखेस वादी हे नेहमी हजर असतात. केवळ प्रतिवादी यांना त्रास देण्यासाठी ते गैरहजर राहिलेले आहेत. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा असे त्यांनी नमुद केले.

३. हा दावा जाहीर ठराव मागणीसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा गुणदोषावर अंतिम व योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी उभय पक्षकार यांना त्यांची बाजु मांडण्यासाठी पुरेशी संधी देणे गरजेचे आहे. वादी हे उलट तपासणीसाठी ब-याच कालावधीपासुन गैरहजर आहेत. त्याबाबत प्रतिवादी यांना कॉस्ट देण्याचा आदेश करुन प्रकरणात वादी यांना त्यांचा साक्षी पुरावा देण्यासाठी हजर रहाण्यास परवानगी देणे योग्य राहील. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## **आ दे श**

वादी यांनी रक्कम रुपये ५०००/- व पूर्वी झालेली कॉस्ट रक्कम आज रोजीच प्रतिवादी यांना द्यावी. त्यानंतर पुढील प्रत्येक तारखेस वादी यांनी उलट तपासणीसाठी न चुकता हजर रहावे या अटीवर वादी सुनिल यांना उलट तपासणीसाठी हजर रहाण्यास परवानगी देण्यात येत आहे.

Sd/-
दिनांक : १६/१२/२०१९
( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# <u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : B.R.Kondekar |
| b | Court | : C.J.S.D. Pandharpur. |
| c | Date of Order | : 16/12/2019 |
| d | Order signed by P.O. on | : 16/12/2019 |
| e | Order uploaded on | : 16/12/2019 |